# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांकः- ७०-२२** **दिनांक - ०१/०३/२०२२**

## अल्पवयीन पिडीतेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीतास अटक.

दिनांक २७/०२/२०२२ रोजी अल्पवयीन पिडीत मुलगी वय-१५ वर्षे हिने पेल्हार पोलीस ठाणेत हजर राहुन तक्रार दिली की दिनांक २५/०२/२०२२ रोजी सायंकाळी ०५.०० वा. सुमारास तीस तीचे पालकांचे कायदेशीर रखवालीतुन इसम नामे. फैजल याने त्याचे टेम्पोतुन राऊंड मारतो असे अमिष दाखवुन टेम्पोत बसवुन तीस बादशहा गार्डन, भाईंदर (पु.) येथुन नालासोपारा फाटा, नालासोपारा (पु.) येथील पत्र्याचे शेडमध्ये घेवुन येवुन रात्रौ.११.०० वा. चे सुमारास तीचेवर जबरी संभोग केला व तीचेकडील मोबाईल काढुन घेवुन झालेला प्रकार कोणास सांगितल्यास जिवे ठार मारेल अशी धमकी आहे. सदरबाबत पेल्हार पो.स्टे. गु.रजि.नं. I १८३/२०२२, भा.दं.वि.सं. कलम-३७६, ३६३, ५०६ सह सह बालकांचे लैंगिक अपराधापासुन सरंक्षण अधिनियम-२०१२ चे कलम- ४, ८, १२ प्रमाणे दिनांक २७/०२/२०२२ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपीतांना अटक करण्याच्या अनुषंगाने गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयाचे घटनास्थळावर भेट देवुन, घटनास्थळावर मिळालेल्या तांत्रिक माहीती व गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहीतीच्या आधारे आरोपीताचा कसोशिने शोध घेवुन आरोपीत नामे. मोहमद फैजल सरवर, रा. नालासोपारा पुर्व, ता. वसई यास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी ताब्यात घेवुन दिनांक २७/०२/२०२२ रोजी सदर गुन्हयात अटक केली आहे. सदर आरोपीताबाबत फिर्यादी पिडीत मुलगी हिस काहीएक माहिती नसतांना घटनास्थळावर मिळालेल्या तांत्रिक माहितीचे आधारे नमुद आरोपीतास पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी कौशल्याने ताब्यात घेतले आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, पोना/तानाजी चव्हाण, प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर, यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

---ooo---